BC. 22-23

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

# मराठी साहित्य व मानवी मूल्ये

संपादक

डॉ. गणेशचंद्र शिंदे

डॉ. संजय जगताप

डॉ. विश्वाधार देशमुख

डॉ. संगीता घुगे

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

# परिकल्पना

© सम्पादकाधीन

प्रथम संस्करण : 2022

ISBN : 978-93-95104-09-8

मूल्य : ₹ 995

शिवानंद तिवारी द्वारा *परिकल्पना*, के-37, अजीत विहार, दिल्ली-110084
से प्रकाशित और शेष प्रकाश शुक्ल, दिल्ली से टाइप सेट होकर
*काम्पैक्ट प्रिंटर्स, दिल्ली-110032 में मुद्रित*

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

27. संत तुकाराम यांच्या अभंगातील मानवी मूल्ये 188
—प्रा. डॉ. भारत भगवानराव भदाडे

28. मानवी मूल्ये आणि राजकीय साहित्य 194
—डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे

29. संत साहित्यातील मूल्य विचार, संत साहित्यातील मानवी मूल्ये 202
—प्रा. डॉ. राजाराम झोडगे/रुपाली गुलाबराव मगर

30. मानवीय मूल्याचे ग्रामगीतेतून दर्शन 208
—प्रा. अनुप अरुण नांदगावकर

31. संत तुकारामांच्या विद्रोही अभंगातून व्यक्त झालेली मानवी मूल्ये 213
—प्रा. डॉ. कांबळे डी.आर.

32. संत तुकाराम महाराजांच्या साहित्यातील मानवी जीवनमूल्यांचा विचार 216
—प्रा. केशव विठ्ठल कोकाटे

33. शैक्षणिक मूल्यऱ्हासाची कारणमीमांसा 221
—डॉ. कोमल वि. ठाकरे

34. मानवी मुल्यांचे दर्शन घडवणाऱ्या 'दृष्टांतपाठ' या अपूर्व ग्रंथाचे स्वरूप 229
—डॉ. माधुरी मनोहरराव पाटील

35. वाङ्मयीन मूल्य 236
—डॉ. नवीन केशवराव सोळंके

36. ग्रामीण साहित्यातील मानवी मूल्ये 241
—डॉ. एल.डी. गलांडे

37. लीळाचरित्रातील मानवी जीवन मूल्ये 245
—प्रा. डॉ. कल्पना त्र्यंबक मेहरे

38. समकालीन वास्तवात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मूल्याविष्कार : एक दृष्टिक्षेप 250
—डॉ. माधव हैबतकर

39. संत साहित्य आणि समाज प्रबोधन 256
—मारुती भोसले

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

# 29. संत साहित्यातील मूल्य विचार, संत साहित्यातील मानवी मूल्ये

*प्रा. डॉ. राजाराम झोडगे*
*मार्गदर्शक*
*सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख*
*नूतन महाविद्यालय, सेलू*
*रुपाली गुलाबराव मगर*
संशोधक

संत साहित्य हे मराठी साहित्याचा आणि संस्कृतीचा एक अविभाज्य भाग, श्रीमंत वारसा, महाराष्ट्राचे एक महत्वाचे सांस्कृतिक संचित आहे. संत साहित्याला फाटा देऊन मराठी संस्कृतीचा विचार करणे संभवणारे नाही. म्हणूनच या साहित्याला महाराष्ट्राचे वेद असे संबोधले जाते.

एकुणच मध्ययुगीन संत साहित्याचा मराठी व मराठी माणसावर एक वेगळा ठसा उमटला आहे. संत साहित्य हे केवळ साहित्य धन नसून सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक वारसा आहे. संतांनी त्यांच्या कर्म आणि साहित्यातून संपुर्ण मानवी जीवनाला व्यापणारे श्वाश्वत मूल्यच प्रदान केले. जे आजच्या आधुनिक काळातील बदलत्या समाज जीवनाला अत्यंत पोषक तर आहेतच शिवाय उत्तम मार्गदर्शक आहेत.

सामाजिक स्वास्थ अबाधित राखवण्यासाठी मानवी मूल्यांचा आग्रह सातत्याने धरला जातो. संत साहित्य हे मानवी मूल्य विचारांनी काठोकाठ भरलेले आहे. मूल्य विचाराशिवाय संत साहित्याला विचार करणे अशक्य आहे.

**मूल्यविचार :** मूल्य हा शब्द मराठीत अनेक अर्थाने वापरला जातो. मूल्य म्हणजे मुद्दल पगार, वेतन, किंमत इ. मराटीत मूल्य या शब्दाचा अर्थ किंमत जसा आहे तसाच मूल्य शब्दाचा अर्थ महत्व असाही आहे. इंग्रजीत Price हा शब्द वापरला जातो. परंतू इतक्या मर्यादित अर्थमात्र मुल्य या संज्ञेचा नाही. तर मूल्य म्हणजे महत्व, शाश्वत आदर्श तत्वे असाही अर्थ आहे.

थोडक्यात मूल्ये ही संज्ञा एखाद्या गोष्टीमागील शाश्वत तत्व सांगणे या अर्थाने वापरली जाते. मूल्य ही अतिशय व्यापर अशी संज्ञा आहे. उदाहरणार्थ सामाजिक, जीवनमूल्ये नैतिक मूल्ये, लोकशाही मूल्ये, वैज्ञानिक मूल्ये, वाडमयीन मूल्ये इत्यादी संत



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

P
Nutan
SELU

साहित्याचा मूल्यांचा अंगाने विचार करताना नैतिक मूल्येच विचारात घेतले जातात.

मराठी संत साहित्यात संत ज्ञानेश्वरांची भावार्थ दिपिका, अमृतानुभव, अभंग, पसायदान म्हणजे समस्या मानवी जीवनाला अनमोल मार्गदर्शन आहे. मराठी संत साहित्याने कधी दैवी संपत्तीचे वर्णन करुन कधी ज्ञानी पुरुषाचे वर्णन करुन, कधी मुर्खाची लक्षणे सांगून, खरे जीवनादर्श कोणते हे जन सामान्यांना मोठ्या कळवळयाने सांगितले.

सत्य अहिंसा, सदाचरण, परधन-परदारा यांची अभिलाषा न बाळगणे प्रमाणेच दुसऱ्याच्या हिताचीही चिंता वाहणे, समता, अपरिग्रह, विवेक निष्ठा, मानवतावाद, विश्वबंधुता सर्वाभूती भगवदभाव या जीवन मुल्यांपैकी सर्वच मूल्ये आजच्या जीवनाला उपकारक आहेत. पुढील मानवी जीवनालाही ती चिरंतन असतील.

*आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।*

*तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥1॥*

विश्व कल्याणाची स्वप्न पाहणारे ज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान या सर्वातल एक अत्यंत मनोरम, हदय, काव्यात्म, तरल, स्व-संवेद्य स्वप्नं म्हणजे पसायदान होय. इथं वागयज्ञाची पुर्ती होत असताना ज्ञानदेव विश्वात्मक देवाला वरदान मागत आहेत. त्यांना एक असं विश्व हवं आहे, ज्याच्यामध्ये त्यांच्या या सऱ्या मनोकामना, इच्छा, आकांक्षा पुर्ण झालेल्या आहेत. त्यांच्या मनातलं निर्गुण स्वप्न-साकार झालं आहे.

द्वेष ईर्ष्या, वैरभाव, हिंसा, हत्या, विनाश, कृतघ्नता, स्वार्थपरायणता, आपपरभाव यांच्या अस्तित्व तरी उरेल का? ते आपोआपच अदृश्य होतील, नाहीसे होतील नि सारं विश्व, त्यातले प्राणीमात्र, चराचर गुण्यागोविंदानं नांदू लागतील.

ज्ञानदेवांच्या पसायदानानं, सर्वांनाच शतकानुशतक किती प्रेरणा दिल्या या प्रदेरणांनी जनमानसावर उदात्ततेचे, शुचित्वाचे, मांगल्याचे, विश्ध्वकल्याणाचे, जनकल्याणाचे, सर्वांच्या अभ्युदयाची कामना जागृत करणारे मौलिक संस्कार केले, जे शाश्वत आहे. विश्वाच्या अंतापर्यंत राहतील.

लीळाचरित्र 1268 मध्ये आणि सिद्धान्त सुत्रे 1282 मध्ये संकलित झाले आणि चक्रधर पंथाचे प्रमाण ग्रंथ म्हणून त्यांना मान्यता मिळाली. हा ग्रंथ म्हणजे चक्रधरांचा जीवनपटच उलगडून दाखवणारा आचार ग्रंथ होय.

ज्ञानेश्वरांनी इतर संताप्रमाणेच चक्रधरांची शिकवण माणुसकीची होती. नुसती शिकवण नव्हे, प्रवचने नव्हेत तर शुद्रात्तिशुद्रांशी जिवाळयाने वागणे, त्यांच्या घरी राहणे, त्यांच्याकडे जेवणे, स्त्रियांना सौजन्याने वागवणे यांसारख्या माणुसकीच्या गोष्टी तयांनी प्रत्यक्ष केल्या चक्रधरांच्या शिकवणुकीची आजही गरज आहे.

महानुभव संप्रदायाने आचार धर्मासाठी फार चांगली संज्ञा उपयोजिली आहे. असती परी म्हणजे वागण्याची पध्दती इंद्रियांवर नियंत्रण कसे प्रस्थापित करावे व त्यातून मनोनिग्रह साधून साधना कशी करावी. याविषयी संत साहित्यात केलेले हे

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

विवेचन कधीही कालबाह्य ठरणार नाही. असेच आहे.

आजच्या भौतिक जगात जी भोगलालसा दिसते आहे. तिचे कितीतरी भयानक दुष्परिणाम आढळतात. मनोनिग्रहाचा अभाव हे याचे मुळ कारण आहे. त्यामुळे त्याचे दुष्परिणाम म्हणजे हरघडी बलात्कार, हिंसा, भ्रष्टाचार विवेकहीन वर्तन, पाशवी अत्याचार, दमन, शोषण, सर्व प्रकारच्या वासनांचे शमन इ. विषयीच्या घअना घडत असतात आणि त्या पाहून आपले मन सुन्न होते. काम क्रोधादि षडरिपूंच्या प्रभावामुळे हे घडते. हे संत साहित्याने शतकानुशतके सांगितले व जनसामान्यावर हे उदात्त संस्कार केले. या उदात्त मुल्यांची आजच्या काळात नितांत गरज आहे.

इंद्रिय निग्रहाचे सुसंस्कार करण्याचे सामर्थ्य संत साहित्यात आहे आणि म्हणून आजच्या भरकटणाऱ्या तरुण पिढीवर संत साहित्याचे हे उदात्त संस्कार होणे आवश्यक आहे. सर्वच संतांनी अंध श्रध्देवर हल्ला केला. करणी, शुद्र देवता भक्ती, देवतांचाकोप तसेच पशुबळी ही अंध श्रध्देची मुळे, उच्च वर्णीट मंडळी सुध्दा सोवळे-ओवळे उपास तापास यावर आधारलेली व्रत वैकल्ये करण्यातच धन्यता मानीत, मुर्तिपूजा किंवा दगडाची पूजा याबद्दल नामदेवांनी म्हटले आहे की,

*दगडी देव इच्छा पुरवित। तरी काते भंगत अपघाताने।।*

ज्ञानदेवांपासून निळोबांपर्यंत संतांच्या पाखंड खंडनपर अभंग याची साक्ष देतात. तुकोबा तर यातले आग्रणी वाटतात त्यांना जिथतिथं असे दुर्व्यावहार निदूर्जन आढळले. त्या-त्या ठिकाणी त्यांच्या वाणीन परखर प्रहार केला आहे. तुकडोजी महाराज नि गाडगेबाबा यांचाही या संदर्भात आवर्जुन उल्लेख करायला हवा.

परद्रव्य परनारी। याचा घरी विटाळ।। पत्नी शिवाय अन्य स्त्रीशी किंबा अतरांच्या कन्या, बहिणी, माता, सुबला, अबला, आश्रीत, निराश्रीत अशा कोणत्याही स्त्रीशी संबंध ठेवू नये हे सर्वथा अवैध व अनैतिक असे पापकर्म आहे.

सर्बाभूती समदृष्टी। हेचि भक्ती गोड मोठी असं नामदेवांनी म्हटलं आहे. ते सार्थ आहे. नामदेवांनी नीतीधर्माची महतीही पुढील अभंगात गाईली आहे.

*पहा परदारा जननिये समान। परद्रव्य पाषण म्हणोनि मानी।*
*पररानंदा, परपीडना, सांडोनिया। भजन हरिचे करा।*

अशा परदास व्यवहाराचा विराळ धरावा असे संत तुकोबाराय व संत नामदेव सांगतात ते आजही आचरणीय आहे.

*भूतदया गायी पशुंचे पाळण। तान्हेल्या जीवन वनामाजी।।* (संत तुकाराम)

गायींची हत्या करु नये, गाय, बैल, म्हैस, पशु, पक्षी यांचे पालण करावे, भुकेल्यांना अन्न द्यावे व रानावणात तहानलेल्या क्षुधाक्रांत तृष्णक्रांत जिवांना अन्नपाणी देऊन भूत दयावादी असा एक आदर्श संदेश तुकाराम महाराज आपल्या अक्षय अभंगवाणीतून समाजाला देतात.

विवेकनिष्ठा हा संत साहित्याच्या पाया तिच्या पुरस्कार विविध धर्मीय पंथीय संतांनी

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

सातत्याने केला. हा विवेक त्यांनी जीवन व्यवहारांच्या संदर्भातही केला. सत्कर्म आणि कुकर्म यातील भेदरेषा यामुळेच समाज ओळखू शकला. उदात्त जीवनमूल्ये कोणती? हे या संत व संत साहित्याने वेळोवेळी समाजाला समजावून सांगितले.

आजही संत साहित्य मध्ययुगा इतके आवश्यक आहे. अनेक दैवतवाद, अनावश्यक कर्मकांड व व्रतवैकल्ये, पुरोहितांचा पोट भरुपणा नवससायासाठी इ. सामाजिक दुखणी आजही आहेत. या संदर्भात जनसामान्यांचे प्रबोधन करण्यासाठी संत साहित्य हे महत्वाचे प्रसार माध्यम आहे.

एकविसाव्या शतकातील विज्ञानाची गरुड भरारी आज सर्व विश्वाला जेवढी सहाय्यक आहे. त्यापेक्षा अधिक हानिकारक असल्याचे पहिले महायुध्द व दुसऱ्या महायुध्दवरुन कल्पना येते.

**सद्य :** स्थितीत वैज्ञानिकांना अधिक भेडसावणारा प्रश्न कलद्रवादी नि अहंवादी प्रवृत्ती बहावण्यास होणाऱ्या विश्वाचा विध्वंसाचा अहिंसा या एकविसाव्या शतकात महत्व प्राप्त झालेल्या मूल्याला संतांनी आपल्या रचनेत अनन्य साधारण असे स्थान दिले आहे. संत ज्ञानेश्वरांनी, संत रामदासांनी अहिंसेला अतिशय महत्व दिले आहे. त्यांच्या मते अहिंसा हे ज्ञानी योग्य लक्षण आहे.

**विषमता निर्मूलन :** विषम वर्णव्यवस्थेला संत व संत साहित्याने कायम विरोधच केला. महानुभवा संप्रदाय हा यातील अग्रेसर संप्रदाय त्याने ही बैठकच अमान्य केली. वारकरी संप्रदायानेही स्त्रीशुद्रांना भक्तीचा अधिकार असल्याचे घोषित केले. नागेश संप्रदायाने तर लिंगायत, तेली, महार ब्रामहण, मूल्यमान या साऱ्यांनाच एका सुत्रात गोवले.

आजचा महाराष्ट्रीय समाज जाती-उपजातीत दुभंगलेला आहे. मानवतावादी व समतावादी संतांचे साहित्य या समाजावर चागले संस्कार करुन त्याला पुन्हा एकसंध रुप देऊ शकते. यासाठीही या साहित्याच्या अध्ययनाची व प्रसाराची आज गरज आहे.

**मानवता व विश्वात्मकता :** मराठी संत साहित्याने या दोन्ही मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रातील सूफी संतांच्या साहित्यातही याच मूल्यांची जपणूक केल्याचे आढळते. शेख महंमदाचा योग संग्राम आणि शहामुनींचा सिध्दान्त बोध यांच्या निर्मितच प्रयोजनही मानवता व विश्वात्मकता प्रस्थापित करणे होय.

'श्रम प्रतिष्ठा' या मुल्याला म. बसवेश्वरांच्या वचन साहित्यात फार फार महत्वाच स्थान आहे. ही प्रतिष्ठा केबळ कोणताही सामाजिक व्यवसाय, व समाजोपयोगी कर्म यांच समीकरण म. बसवेश्वर मांडतात. बसवेश्वरांनी श्रम प्रतिष्ठेच्या आदर्श मूल्याला केवळ स्वप्नांचा व मृगजळाच्या अंतरावर न ठेवता ते समाज जागृती व वास्तवतेच्या स्तरावर आणलं.

'वचन साहित्यात' अंध श्रध्दा व अनावश्यक धार्मिक रुढी नाकारल्या. त्यातून उदात्त जीवनादर्श प्रकटले आहेत.

वचन साहित्यातील अनुभव मंटप ही संकल्पना सर्व समावेशक, समन्वयवादी,

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
Selu Dist. Parbhani

जाती-जातींची व चातुवर्ण्या व्यवस्थेतील उच्च-नीचतेची, विषमताधिष्ठित समाज व्यवस्था झुगारणारी आहे.

**स्त्री प्रतिष्ठा :** आजच्या समाजात स्त्री विषयक दृष्टीकोन बदलला असे म्हणतो. पण बाराव्या शतकातील स्त्री संत मुक्ताई, जनाई, कान्होपात्र, बहिणाबाई, सोयराबाई, महदंना, यांनी रचिलेल्या अभंगातून आजच्या स्त्री ला संदेशच जणू दिला आहे.

*स्त्री जन्म मिळाला म्हणूनी न व्हावे उदासा।* -संत जनाबाई.

स्त्री भ्रूण हत्या समाजाला लागलेला एक कलंक दूर करण्यासाठी संत जनाई वरील अभंगातून मोलाचा सल्ला देतात. दुबळया व स्वतः ला कमी लेखणाऱ्या स्त्री ला जगण्याचे बळच देऊन जातात. आज मूल्याधिष्ठित शिक्षण व्यवस्थेचा स्वीकार करण्यासाठी संत विचारांना महत्वाचे स्थान द्यावे लागते. संत साहित्यातील व्यक्ती विकासाला पोषण जीवन मूल्यांची सांगड शिक्षण व्यवस्थेशी घातली गेल्यास भावी काळातील धोके आणि आव्हानं लक्षात घेऊन विधायक अभ्यासक्रमांची पुर्नरचना केल्यास युवचा पिढीशी तुटू पाहात असलेली नाळ पुन्हा जोडता येईल.

भ्रष्टाचार, अश्रध्द प्रवृत्ती, चंगळवाद, भोगवाद, हिंसा, शुचित्वाची पायमल्ली यामुळ कमालीची अस्वस्थता आजच्या समाजात निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत अंतर्मुख होऊन या असत. प्रवृत्तींना विरोध करण्याचा प्रयत्न आज होताना दिसतो. समाज प्रबोधनकारांना संत-मुल्यांचा प्रसार करण्यासाठी उदात्त विचारांच्या संत साहित्याचाच उपयोग होणार आहे. कारण संत साहित्य हे अस भक्कम एक निष्ठेच आदरच स्थान आहे ते समाज प्रबोधनाच कार्य करताना उपयुकक्तच ठरणार आहे.

जो कोणाशीही बाईट वागत नाही. जो शांत आहे. जो आपल्या वडिलांचे महत्व वाढवितो, तोच मोक्षाला प्राप्त होतो. असे तुकारामांचे मत आहे. या विचारांचे संस्कार आजच्या नवीन पिढीवर, पिठीतील बालमनावर करण्याची गरज आहे. जेणेकरुन पुढे प्रत्येक पिए वर हे संस्कार होत जातील. संत तुकाराम महाराज म्हणतात,

*शांती क्षमा दया। अलंकार अंगी। अभंग प्रसंगी। धैयवंत।*

म्हणजे दया, क्षमा, शांती या मूल्यांवर संतांचा अतिशय भर होता. संतांचे विचार, चारिर्त्य, कार्य, वाडमय यांच्या मुळाशी जन कल्याण, विश्व कल्याण हेच प्रयोजन असल्याचे दिसून येते.

**समारोप :** मराठी संत साहित्याने जन मानसावर उदात्त मुल्यांचे संस्कार केले. विवेक निष्ठ जीवन दृष्टी समाजाता दिली. विषमतेच्या विरोधाची बीजे जन सामान्यांच्या मनात पेरली. समतेचा उद्घोष केला. अंधश्रध्दा-निर्मूलल करुन समतावाद, विवेकवाद, मानवतावाद, विश्वबंधु व या मूल्यांची प्रतिष्ठापना केली आणि हे सारे जन हिताच्या कळवण्यासपोटी केले. ही अक्षरमूल्ये ज्यात जतन केली आहेत ते कालचे संत साहित्य आजच्या संदर्भात अत्यंत उपयुक्त व भावी चिरंतन साहित्य आहे.

NUTAN MAHAVIDYALAYA SELU
PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

संदर्भ


1. सरदार गं. बा., 'संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङमय ग्रह, मुंबई, चौथी आवृत्ती, 2013, पृ. 21
2. बारपांडे मृण्मयी, 'संत समागम' य लोकवाङमय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, जाने, 2018 पृ. 24-25
3. यशवंते डॉ. राजीव, 'मध्ययुगीन साहित्यान्वय', एज्युकेशनल पब्लिशर्स अण्ड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 3 मार्च 2020, पृ. 167, 163
4. डॉ. विष्णु भिकाजी कोलते, मराठी संतांचे सामाजिक कार्य, 'लोक वाङमय ग्रह', पहिली आवृत्ती, ऑगस्ट 2024, पृ. 10
5. डॉ. यू. म. पठाण, 'मध्ययुगीन संत साहित्य, काही आयाम', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, जून 2003, पृ. 86
6. डॉ. काळे कल्याण, स्नेह वर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर 1992, पृ. 56
7. ह.भ.प. प्राचार्य सु.ग. चव्हाण, 'संत संदेश', गोदावरी प्रकाशन, खरबी जि. नांदेड, प्रथम आवृत्ती, सोमवार 14 जानेवारी 2013, पृ. 24



NUTAN MAHAVIDYALAYA SELU

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA
SELU



परिकल्पना
के-37, अजीत विहार, दिल्ली-110084
मो. 9963084132, 7982062594
e-mail : parikalpana.delhi2016@gmail.com

ISBN 978-93-95104-09-8